## सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की

माननीय सर्वोच्च न्यायालय यांचेकडुन पुढील काही दिवसात रामजन्मभूमी व बाबरी मस्जिद या संवेदनशील विषयावर निकाल अपेक्षित आहे. हा निकाल देणारी यंत्रणा म्हणजे देशाची सर्वोच्च न्याय व्यवस्था आहे.त्याच्यावर सर्व भारतीय जनतेचा विश्वास आहे.तरी सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल हा सर्व भारतीय नागरीकांनी पाळणे बंधनकारक आहे.

सर्व नागरिकांनी सदरच्या निकालानंतर व्हाट्सअॅप,फेसबुक अथवा इतर सोशल मीडीयावर भडक प्रतिक्रिया देणे अथवा पत्रकबाजी करणे टीकाटिपणी करणे टाळावे .अशा कृत्यांमुळे कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण झाल्यास असे करणा-या व्यक्तीविरोधात कडक कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**<u>तरी कृपया नागरीकांनी खालील सुचानांचे पालन करावे.</u>**

- ➢ जमाव करुन थांबु नये, भाषणबाजी करु नये.
- ➢ सोशल मीडियावर सदर निकालाचे अनुषंगाने कोणत्याही धर्माच्या भावना दुखावतील अशा प्रकारचे संदेश प्रसारीत करु नयेत.
- ➢ निकालानंतर गुलाल उधळु नये , फटाके वाजवु नयेत, घोषणाबाजी जल्लोष करु नये.
- ➢ मिरवणुक रॅली अथवा मोटारसायकल रॅली काढु नये.सायलेन्सर काढुन गाडया चालवु नयेत.
- ➢ महाआरती अथवा समुह पठण यांचे आयोजन करु नये.
- ➢ निकाला निमित्त पेढे, साखर अथवा मिठाई वाटू नयेत.
- ➢ कोणतेही वादय वाजवू नये.धार्मिक भावना दुखावणाच्या बुध्दिपुरस्सर उददे्शाने शब्द उच्चारु नये.
- ➢ कोणत्याही प्रकारचे जातीय दंगलीच्या अनुषंगाने जुने व्हिडीओ,फोटो पुन्हा प्रसारित करुन अफवा पसरवू नये.

तरी वरील सुचनांचे उल्लंघन केल्यास जातीय तणाव निर्माण केल्यास, भावना भडकवल्यास त्यांचेवर खालील नमुद भारतीय दंड सहिता कलम व इतर प्रचलित कायदयान्वये दखलपात्र स्वरुपाचे गुन्हे दाखल करुन तात्काळ अटक करुन मा.न्यायालय समक्ष हजर करण्यात येईल.

- ❖ भारतीय दंड सहिता कलम 295 कोणत्याही वर्गाच्या धर्माचा अपमान करण्याच्या उद्‌देशाने उपासना स्थानाचे नुकसान करणे अगर ते अपवित्र करणे
- ❖ कलम 295 (अ) कोणत्याही वर्गाच्या धर्माचा किंवा धार्मिक श्रध्दांचा अपमान करुन धार्मिक भावनांवर अत्याचार करणाच्या उद्‌देशाने बुध्दिपुरस्सर व दुष्ट उद्‌देशाने कृती करणे
- ❖ कलम 298 धार्मिक भावना दुखावण्याचा च्या बुध्दिपुरस्सर उद्‌देशाने शब्द उच्चारने

तरी सर्व नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन करण्यात येत आहे.आपल्या प्रत्येक हालचालीवर पोलीसांचे व सायबर सेलचे लक्ष्य आहे.

Scanned by CamScanner